आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
१५ एप्रिल २०२६ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- तंत्रज्ञानातल्या प्रगतीमुळे ग्रामीण आणि शहरी भागातल्या आरोग्य व्यवस्थेतली दरी संपुष्टात आणण्याची गरज राष्ट्रपतींकडून व्यक्त

- भाजपा नेते सम्राट चौधरी यांनी घेतली बिहारच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ

- अमरावतीमधल्या अल्पवयीन मुलींच्या छळ प्रकरणाची चौकशी करण्यासाठी SIT ची स्थापना, नाशिकमध्ये टीसीएसच्या बीपीओमध्ये झालेल्या लैंगिक छळ प्रकरणी राष्ट्रीय महिला आयोगाकडून समितीची स्थापना

- युरोपियन गर्ल्स गणित ऑलिम्पियाडमध्ये भारताची तीन पदकांची कमाई, मुंबईच्या श्रेया मुंदडानं पटकावलं सुवर्णपदक

**आणि**

- मुंबईसह १५ जिल्ह्यांसाठी आज आणि उद्या उष्णतेचा 'यलो अलर्ट', तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट येण्याची शक्यता

**<><><><><>**

तंत्रज्ञानातल्या प्रगतीमुळे ग्रामीण आणि शहरी भागातल्या आरोग्य व्यवस्थेतली दरी संपुष्टात यायला हवी अशी अपेक्षा राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी व्यक्त केली. या अनुषंगाने नागपूर एम्स काम करत आहे, असं त्या म्हणाल्या. नागपूरच्या एम्स अर्थात अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेच्या दुसऱ्या दीक्षान्त समारंभा त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. देशातल्या पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी केंद्र सरकारनं गेल्या दहा वर्षांत अनेक उपाययोजना आणल्या, असं त्या म्हणाल्या. यावेळी त्यांनी आयुष्मान भारत जन आरोग्य योजने अंतर्गत दिल्या जाणाऱ्या सुविधांचाही उल्लेख केला.

**होल्ड बाईट राष्ट्रपती**

यावेळी राष्ट्रपतींनी आठ विद्यार्थ्यांना सुवर्ण पदक प्रदान केली. त्याआधी मुर्मू यांचं आज सकाळी नागपूर इथल्या डॉ बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावर आगमन झालं, तेव्हा. राज्यपाल जिष्णूदेव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी त्यांचं  स्वागत केलं.

राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमी इथं भारतीय महसूल सेवेच्या ७८ व्या तुकडीच्या प्रशिक्षण समापन समारंभातही राष्ट्रपती सहभागी झाल्या.

**<><><><><>**

भाजपा नेते सम्राट चौधरी यांनी आज बिहारच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. बिहारचे ते २४ वे मुख्यमंत्री आहेत. भाजपाच्या नेतृत्त्वाखाली पहिल्यांदाच बिहारमध्ये सरकार स्थापन झालं आहे. राज्यपाल निवृत्त लेफ्टनंट जनरल सय्यद अता हसनैन यांनी पाटण्यातल्या लोकभवनात त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. संयुक्त जनता दलाचे विजय कुमार चौधरी आणि बिजेंद्र प्रसाद यांनी यावेळी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. त्यानंतर खातेवाटपही  करण्यात आलं.

**<><><><><>**

अमरावती जिल्ह्यात अचलपूर–परतवाडा परिसरात अल्पवयीन मुलींचे अश्लील व्हिडिओ व्हायरल झाल्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी पोलिसांनी SIT अर्थात विशेष तपास पथकाची स्थापना केली आहे. १० पोलिस अधिकारी आणि ३६ कर्मचारी अचलपूरच्या सहाय्यक पोलीस अधीक्षकांच्या नेतृत्त्वाखाली या प्रकरणाची चौकशी करणार आहेत. याप्रकरणी पोलिसांनी मोहम्मद अयाझ याच्यासह एकूण ४ जणांना अटक केली आहे. त्यांनी सुमारे १८० अल्पवयीन मुलींना प्रेमाच्या जाळ्यात फसवून त्यांचे अश्लील व्हिडीओ काढले. त्यानंतर या व्हिडीओच्या आधारे त्यांना ब्लॅकमेल केलं आणि वेश्याव्यवसायात ढकललं असा आरोप आहे.

या घटनेच्या निषेधार्थ आज शहरातली बाजारपेठ बंद ठेवण्याच्या विविध सामाजिक संघटनांच्या निर्णयाला नागरिकांनी चांगला प्रतिसाद दिला. या प्रकरणात अनेक व्हिडिओ क्लिप्स तयार झाल्याची माहिती तपासादरम्यान समोर आली असून काही मुलींची ओळखही पटवण्यात पोलिसांना यश आलं आहे. पोलिसांनी आरोपीकडचे मोबाईल आणि इतर डिजिटल साधनं जप्त करून त्यांची सायबर तपासणी सुरू केली आहे.

अचलपूर नगरपरिषदेनं आरोपीच्या घराचं अवैध बांधकाम तोडलं आहे.

**<><><><><>**

नाशिकमध्ये टीसीएसच्या बीपीओमध्ये झालेल्या लैंगिक छळ प्रकरणी तथ्यांची पडताळणी करण्यासाठी राष्ट्रीय महिला आयोगानं एका समितीची स्थापना केली आहे. शुक्रवारी ही समिती नाशिकमध्ये कंपनीच्या कार्यालयाला भेट देणार आहे. १० दिवसात या समितीला अहवाल देण्याचे आदेश आयोगानं दिले आहेत. मुंबई उच्च न्यायालयाच्या सेवानिवृत्त न्यायाधीश न्यायमूर्ती साधना जाधव या समितीच्या अध्यक्ष असतील. हरियाणाचे माजी पोलीस महासंचालक बी. के. सिन्हा, सर्वोच्च न्यायालयातल्या वकील मोनिका अरोरा आणि आयोगाच्या समन्वयक लीलावती या समितीमध्ये आहेत.

**<><><><><>**

एसटीचा तोटा कमी करण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याचे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत. ते आज मुंबईत एसटी महामंडळाच्या मुख्यालयात आयोज्त आढावा बैठकीत बोलत होते. २०२५-२६ या आर्थिक वर्षात एसटीचं उत्पन्न ११ हजार ४७५ कोटी रुपये झालं, तर खर्च १२ हजार ६६ कोटी रुपये झाला. परिणामी महामंडळाला ५९१ कोटी रुपयांचा तोटा सहन करावा लागला. राज्यातल्या एकूण ३१ विभागांपैकी केवळ ८ विभाग नफ्यात

आहेत. तोट्यातल्या २३ विभागांची सखोल चौकशी करून याची कारणमिमांसा करावी आणि त्यावर ठोस उपाययोजना राबवाव्यात, असं सरनाईक यांनी सांगितलं.

एसटी महामंडळ आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी प्रशासकीय शिस्त, संसाधनांचा प्रभावी वापर, आणि जबाबदारी निश्चिती या तत्त्वांवर भर देत लवकरच व्यापक सुधारणा आराखडा राबवला जाईल, असंही ते म्हणाले.

**<><><><><>**

फ्रान्समधल्या बोर्डो इथं झालेल्या १५ व्या युरोपियन गर्ल्स गणित ऑलिम्पियाडमध्ये मुंबईच्या श्रेया मुंदडा हिनं सुवर्णपदक पटकावलं. त्यामुळे पाहुणा संघ म्हणून सहभागी झालेल्या भारताला या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत पहिल्यांदाच सुवर्णपदक मिळालं. या स्पर्धेत भारतीय संघानं एक सुवर्ण, एक रौप्य आणि एक कांस्य अशा तीन पदकांची कमाई केली. केरळच्या संजना चाको हिला रौप्य पदक, तर तामिळनाडूच्या शिवानी कुमार हिला कांस्य पदक मिळालं. ९ ते १५ एप्रिल दरम्यान झालेल्या या स्पर्धेत ६७ देशातल्या २६० विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या. भारतीय संघात ४ सदस्य होते.

**<><><><><>**

महिला आरक्षण विधेयक समतोल असून प्रत्येक राज्याच्या, समुदायाच्या आणि प्रदेशाच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी समर्थ असल्याचं संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी म्हटलं आहे. नारी शक्ती वंदन अधिनियम विधेयकातल्या दुरुस्त्यांवर चर्चा करण्यासाठी आणि पारित करण्यासाठी उद्यापासून संसदेचं विशेष अधिवेशन सुरु होणार असल्याचं रिजिजू यांनी सांगितलं.

या विधेयकावर लोकसभेत अठरा तास चर्चा अपेक्षित आहे, तर राज्यसभेत दहा तासांची चर्चा ठेवली असल्याचं रिजिजू यांनी सांगितलं.

दरम्यान, माजी राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून महिला आरक्षण विधेयकाला पाठिंबा दिला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनीही राज्यातल्या खासदारांना पत्र लिहून या सुधारणांना पाठिंबा देण्याची विनंती केली आहे.

**<><><><>**

मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स आज १ हजार २६४ अंकांनी वधारून ७८ हजार १११ अंकांवर स्थिरावला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही ३८९ अंकांची वाढ नोंदवत २४ हजार २३१ अंकांवर स्थिरावला. अमेरिका आणि इराण यांच्यात युद्धबंदीबाबत पुन्हा चर्चा सुरु होण्याच्या शक्यतेच्या पार्श्वभूमीवर शेअर बाजाराचा कल आज सकारात्मक राहिला. त्यामुळं बहुतांश कंपन्यांचे समभाग वधारले.

**<><><><>**

सीबीएसई अर्थात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळानं २०२५-२०२६ मध्ये घेतलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल आज जाहीर झाला. cbse.gov.in, results.cbse.nic.in आणि cbseresults.nic.in या मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळांवर तसंच डिजिलॉकर आणि उमंग ॲपवरही विद्यार्थ्यांना निकाल पाहता येईल. या परीक्षेत एकूण ९३ पूर्णांक ७ दशांश टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

**<><><><>**

भारतीय हवामान विभागानं राज्यातल्या पालघर, ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सांगली, सोलापूर, अकोला, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, अमरावती आणि वर्धा या १५ जिल्ह्यांसाठी आज आणि उद्या उष्णतेचा 'यलो अलर्ट' जारी केला आहे. येत्या दोन दिवसांत या जिल्ह्यांमध्ये तापमानात वाढ होणार असून, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट येण्याची दाट शक्यता आहे.

**//<><><><>//**